**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** अरुण महादेव मैंद.

**वय -** ५४ वर्ष, **व्यवसाय -** शेती,

**राहणार.-** कडगाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सरकार पक्षातर्फे सरतपास– श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील.**

**१.** मला दि. ०६.०८.२०१९ रोजी पोलिसांनी फोन करुन उत्तूर–आजरा रस्त्यावरती आर्दाळ बस थांब्याजवळ पंचनामा करण्यासाठी सायंकाळी ०५.०० वाजता बोलाविले होते. त्यावेळी माझ्या सोबत दुसरा पंच केरबा तहसिलदार आलेला होता.

**२.** आम्ही घटनास्थळी गेलो तेव्हा तेथे पांडुरंग इंजल हजर होता. त्याने आम्हाला अपघाताची संपुर्ण माहिती दिली होती. त्याप्रमाणे आम्ही पाहणी केली असता आम्हाला बस स्थानकाच्या पुढे पुर्वेला पावले व आजगेकर यांच्या प्लॉटजवळ मोटारसायकलच्या चाकाच्या खुणा आणि पुढे मोटारसायकल चिखलात पडलेली दिसली होती. त्याच्या पश्चिमेला गुरवांची शेतजमीन आहे. तेथून रस्ता दक्षिणोत्तर गेलेला आहे.

**३.** तेथे ब्रीझा गाडीचा टायर फुटल्यामुळे रीम घासत गेल्याच्या खुणा होत्या. आता मला पोलिसांनी माझ्या समक्ष केलेला घटनास्थळ पंचनामा दाखवला, त्यावरती माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला एकत्रीतपणे **नि. क्र. पी. – १९** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**४.** दि. ०६.०८.२०१९ रोजी भरपूर पाऊस झाल्यामुळे नाले, ओढे भरलेले होते. मला त्या दरम्यान गारगोटी रस्त्यावरील पूल वाहून गेल्याची माहिती नाही. त्यावेळी गडहिंग्लजला जाणारा रस्ता बंद होता. त्या रस्त्यावरील गिजवणे पूल बुडलेला होता. पांडुरंग इंजल माझा मित्र असून त्याची सासरवाडी बेळगुंदी आहे. त्याचा मेव्हणा सदर अपघातात मयत झाला आहे. मला पांडुरंगच्या मेव्हण्याच्या गाडीवरती किती लोक जात होते याची माहिती नाही. मला तो कोठे फिरायला गेला होता याची माहिती नाही.

**५**. हे म्हणणे खरे नाही की, मला पांडुरंगने अपघात झालेल्या ठिकाणी बोलावले होते. माझी व पोलिसांची ओळख नाही. मला या घटनेपुर्वी पोलिसांनी फोन केला नव्हता. आम्ही घटनास्थळी गेलो तेव्हा तेथे जखमी व आरोपी कोणीही नव्हते. आम्ही घटनास्थळी गेलो तेव्हा तेथे पांडुरंग इंजल व पोलिस कर्मचारी हजर होते. आम्ही गेलो तेव्हा पाऊस पडत होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी पंचनामा अगोदरच तयार करुन ठेवला होता.

**६**. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पांडुरंगने मला अगोदरच बोलावून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातात पांडुरंगचा मेव्हणा मयत झाल्यामुळे मी त्याला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २५.१०.२०२४.
आजरा.

(आर. पी. थोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.